नि.फौ.प्र.क.११२६/२०१७
सरकार वि. रिना +१
निशाणी कमांक - १६

**सरकारतर्फे साक्षीदार कमांक -०२**

**मी शपथेवर खरे सांगतो की,**

**माझे नाव :** सखाराम सटवाजी मोले
वय - ४६ वर्षे, व्यवसाय-पोलीस उप अधिकक्षक,
राज्य गुन्हे अण्वेषण शाखा, नागपूर.
राह-श्रीकृष्ण नगर, नंदनवन, नागपूर.

**सरतपासणी सरकारतर्फे सहायक सरकारी वकील सौ. पी.टी. धासकट यांचेमार्फत शपथेवर सुरू.**

१) दि.०४.०४.२०१६ रोजी मी लकडगंज पोलीस स्टेशन येथे सहायक पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत होतो. त्या दिवशी मी डयुटीवर असतांना वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या आदेशानुसार मी व माझे दोन सहकारी सकाळी १०.०० ते संध्याकाळी ०९.०० वाजताच्या दरम्यान प्रतिबंधक कार्यवाही व पेटोलींग करीत होतो. त्यावेळी माझ्यासोबत पोलीस कॉन्स्टेबल जयपुरकर, तसेच महिला पोलीस कॉन्सटेबल सुशिला धुर्वे हे दोघे होते. आम्ही गंगा जमुना परिसरात पेटोलींग करीत असतांना १६.३० वाजताच्या सुमारास बांगडे गल्लीत एक महिला रस्त्याच्या कडेला उभे राहून अंगविक्षेपण करुन अश्लीलरित्या हातवारे करुन वेश्या व्यवसायाकरीता येणा-या जाणा-या लोकांना प्रलोभित करीत होती.

२) माझ्या सोबत असलेली महिला कॉन्सटेबल सुशिला धुर्वे यांनी त्या महिलेला ताब्यात घेतले. त्यानंतर मी स्वत: वरिष्ठ पोलीस अधिकारी श्री. माने यांना त्या घटनेबाबत माहिती दिली. त्याप्रमाणे ते स्वत: त्या घटनास्थळी आले. ताब्यात घेतलेल्या महिलेला त्यांच्या समक्ष तिचे नांव विचारले. त्यावेळी त्या महिलेने तिचे नांव रिना जगदिश धनावत असे सांगितले. त्या महिलेला ती वेश्या व्यवसाय

कुठे करते याबाबत विचारणा केली असता तिने सांगितले की, मुन्नीबाई कालखोर या महिलेच्या घरी भाडयाने घेतलेल्या खोलीत ती तो व्यवसाय करते. तिने असेही सांगितले की, त्या व्यवसायातून कमावलेल्या पैशाचा काही भाग ती मुन्नीबाई कालखोर हिला देते.

३) त्यानंतर रिना धनावत या महिलेला घेवून ती ज्या ठिकाणी वेश्या व्यवसाय करते त्या ठिकाणी गेलो. महिला पोलीस कर्मचारी हिने तिची अंगझडती घेतली असता तिच्या जवळ काहीही मिळून आले नाही. त्यानंतर दोन पंचांसमक्ष त्या घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. आता मला दाखविण्यात आलेला पंचनामा हा तोच आहे. त्यावर माझी, तसेच दोन पंच व आरोपी क्र.१ ची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१७** देण्यात येते. त्यानंतर त्या महिलेला पोलीसांच्या मदतीने पोलीस स्टेशनला आणले. मी स्वत: त्या आरोपींविरुध्द पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद ही तीच आहे. त्यावर माझी तसेच दाखल अंमलदार पी.एस.आय. संजय टेमगेरे यांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१८** देण्यात येते. त्यानंतर सदर गुन्हयाचा पुढील वरिष्ठ पोलीस अधिकारी श्री. एस.बी. माने यांनी केला. आज आरोपी क्र.१ रिना धनावत ही कोर्टात हजर नाही. परंतु तिला दाखविल्यास मी तिला ओळखू शकतो.

**सरतपास संपला.**

**उलट तपास आरोपींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. अब्दुल अजीम.**

४) हे म्हणने खरे आहे की, गंगा जमुना परिसर हे गर्दीचे ठिकाण आहे. हे म्हणने खरे आहे की, त्या परिसरात लोकांची घरे एकमेकांना लागुन आहेत. हे म्हणने खरे आहे की, गंगा जमुना परिसरात पोलीस चौकी देखील आहे. हे म्हणने खरे आहे की, त्या

परिसरातील कोणत्याही व्यक्तीने वैयक्तीक रित्या पोलीस स्टेशनला येवून आरोपींविरुध्द तक्रार दिली नव्हती. हे म्हणने खरे आहे की, घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच हे त्या परिसरातील राहणारे नव्हते. हे म्हणने खरे आहे की, सदर पंचांना पंचनाम्याकरीता बोलावण्यापूर्वी नोटीस दिली नव्हती. हे म्हणने खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा हा पोलीस स्टेशनलाच तयार केला. हे म्हणने खरे नाही की, आरोपी क्र.१ हिने मला सांगितले नाही की, ती सदरचा वेश्या व्यवसाय हा आरोपी क्र.२ हिच्या घरात एका भाडयाच्या खोलीत करते व येणा-या उत्पन्नातून काही भाग आरोपी क्र.२ ला देते. हे म्हणने खरे नाही की, आरोपींविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणने खरे नाही की, आज रोजी मी आरोपींविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला.**

**<u>फेरतपास-काही नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत

समक्ष

(ए.पी. गिरडकर)
१५ वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
तथा अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

नागपूर.
दि.०७.१२.२०२२.

निफौ.प्र.क.११२६/२०१७
सरकार वि. रिना +१
निशाणी कमांक – १६

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are word to word same as per original evidence.

Name of Stenographer : A.P. Dharmik